प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com




**नवी दिल्ली : येथील राष्ट्रीय सहकारी संघ या संस्थेच्या वार्षिक सभेत बोलताना रवळनाथ हौसिंग फायनान्सचे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले.**

# मंत्रालयाकडून 'सहकार'च्या विकासासाठी अनुदानाची मागणी

## राष्ट्रीय सहकारी संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत एम. एल. चौगुलेंकडून ठराव

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

देशातील सहकारी संस्थेच्या राष्ट्रीय सहकारी संघ या शिखर संस्थेकडून सभासद प्रशिक्षण आणि संचालक अभ्यास दौरा, संस्था संगणकीकरण, कौशल्य विकास प्रशिक्षण यासाठी अनुदान दिले जात होते. परंतु, सहकार मंत्रालयाची स्थापना झाल्यापासून हे अनुदान बंद झाले आहे. सहकार क्षेत्राच्या विकास आणि वृद्धीसाठी सहकार मंत्रालयाकडून हे अनुदान मिळावे, त्यासाठी सहकार मंत्रालयाकडे राष्ट्रीय सहकारी संघाने शिफारस करावी, असा ठराव श्री रवळनाथ को- ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी मांडला.

नवी दिल्ली येथे आयोजित भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. त्यांनी मांडलेल्या या ठरावाला सर्वानुमते मंजुरी मिळाली. राष्ट्रीय सहकारी संघाचे अध्यक्ष दिलीप संघानी हे अध्यक्षस्थानी होते. चौगुले म्हणाले राष्ट्रीय सहकारी संघाकडील अनुदानामुळे देशातील सहकारी संस्थांना बळ मिळत होते. हे अनुदान व उत्कृष्ट काम करणाऱ्या मल्टिस्टेट सहकारी संस्थांना पुरस्कार देऊन प्रोत्साहन द्यावे. तसेच ग्रामीण भागातील युवक- युवतींना आत्मनिर्भर बनविण्यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण उपक्रम राबवावेत.